महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
website : www.mahadiscom.in
email : managerpom@mahadiscom.in
दुरध्वनी क्र.: ०२२ - २४०७७४४१

क्र. मासंवि/रवका/न.क्र.०९/०७३२ दिनांक: ०५.०१.२०२४

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या. सर्व परिमंडळ.

**विषय :-** कंपनीच्या सेवेत कार्यरत दिव्यांग (अस्थिव्यंग) कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करून देणेबाबत.

**संदर्भ:-** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६३० दि.१०.०८.२०२१.
२) पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.०९/२६१६७ दि.२५.१०.२०२१.
३) पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.०९/२५२२८ दि.२२.०८.२०२३.
४) शासन निर्णय क्र.अप्रवि.२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य ६ दि.०६.१०.२०१२.
५) पत्र क्र. एमव्हीआर०९१२/सीआर/४६ ईबी/का.२(४)/जाक्र.७३७९ दि.२४.०५.२०१३.
६) परिपत्रक क्र. एमव्हीआर०९१२/सीआर/४६ ईबी/का.२(४)/जाक्र.१५१२ दि.०६.०२.२०१५.

*******

उपरोक्त संदर्भीत विषयांस अनुसरून महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या शासन निर्णयाच्या धर्तीवर कंपनीमधील दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे / वाहने उपलब्ध करुन देण्याकरिता संदर्भीय क्र.०१ व ०२ अन्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना वाहन उपलब्ध करुन देण्याच्या कार्यपध्दती बाबत निर्देश दिलेले आहेत.

२. तसेच, संदर्भीय क्र. ३ अन्वये संबंधित कर्मचाऱ्याकडून ऑल इंडिया इस्टिटयुट ऑफ फिजीकल, मेडीसीन अँड रिहॅबिलीटेशन, हाजीअली केशवराव खाडे मार्ग, हाजीअली सरकारी वसाहत, महालक्ष्मी, मुंबई या संस्थेकडून वाहन चालविण्याकरिता शारिरीक तंदुरूस्तीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्याने मागणी केल्यानुसार शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या खरेदी पध्दतीचा अवलंब करून GEMS प्रणालव्दारे BIS प्रमाणीत केलेली दुचाकी व सहाय्यक उपकरण त्या-त्या परिमंडळातील GEMS प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या मंडल कार्यालयाकडून उपलब्ध करून देण्याबातच्या सुचना पारित करण्यात आल्या होत्या.

३. दिव्यांग कर्मचाऱ्यांना शारिरीक तंदुरूस्तीचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याकरिता उपरोक्तपणे विहित केलेल्या कार्यपध्दतीमधील क्लिष्ठता व प्रक्रियेदरम्यान होणारा विलंब विचारात घेउन त्यात सुलभता आणण्याच्या उद्देशाने शासनामधील तरतुदींची पुन:श्च तपासणी करण्यात आली आहे.

४. सबब, या संदर्भात कळविण्यात येते की, संदर्भिय क्र.५ येथील पत्र व क्र.६ येथे नमूद करण्यात आलेल्या परिपत्रकांमधील तरतुदींनुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र, शासन निर्णय दि.०६.१०.२०१२ अन्वये अपंगत्वाचे प्रमाणपत्र वितरीत करण्यासाठी जिल्हानिहाय विहीत करण्यात आलेल्या वैद्यकीय मंडळाने संबंधित कर्मचाऱ्यांना कोणते वाहन फेरफारासह चालविता येईल अशा आशयाचे प्रमाणपत्र दिल्यास ते ग्राहय धरण्यात यावे. त्याचप्रमाणे ऑल इंडिया इस्टिटयुट ऑफ फिजीकल, मेडीसीन अँड रिहॅबिलीटेशन, हाजीअली, केशवराव खाडे मार्ग, हाजीअली सरकारी वसाहत, महालक्ष्मी, मुंबई याच संस्थेकडून वेद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याचा आग्रह धरण्यात येऊ नये.

५.	सबब, आपल्या अधिपत्याखालील ज्या दिव्यांगजन अधिकारी व कर्मचारी यांनी उपरोक्त तरतुदी अंतर्गत वाहन मिळण्याकरिता मागणी केलेली आहे, अशा अधिकारी व कर्मचारी यांना GEMS प्रणालीतून वाहन खरेदीसाठी यापूर्वी विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करून वाहन देण्याकरिता पुढिल कार्यवाही परिमंडळ स्तरावर त्वरीत करण्यात यावी.

सोबत - १. पत्र दि.२४.०५.२०१३
२. परिपत्रक दि.०६.०२.२०१५

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:-**

१. संचालक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२. कार्यकारी संचालक (विवले), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

क्र.एमव्हीआर ०९१२/सीआर ४६ ईबी/का.२(४)/जाक्र ७३७८(४)

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकीय इमारत, ३ रा / ४ था मजला,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१
दिनांक - 24 MAY 2013

24 MAY 2013

**प्रति,**
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.

**विषय :-** शारीरीकदृष्टया अपंग व्यक्तींसाठी प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी वैद्यकीय मंडळ स्थापन करणेबाबत.

**संदर्भ :-** १) केंद्र शासन अधिसूचना क्र. आरटी-११०१२/१२/०१-एमव्हीएल दि.२७.०७.२००८
२) या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र जा.क्र. ८१०९ दिनांक २१.०६.२०१२.
३) शासन पत्र क्र.एमव्हीआर ०११२/प्र.क्र.१२१/पु.बां.०९/परि-२ दि. १३.०२.२०१३.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रं अप्रवि २०१२/प्रक्र २९७आरोग्य ६ दिनांक ०६.१०.२०१२.

वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती प्राप्त करण्यासाठी अपंग व्यक्तीला वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागते. ते सादर करण्यासाठी त्या व्यक्तीस रिहॅबीलीटेशन सेंटर, हाजी अली, मुंबई येथे जावे लागते. सदरची बाब अपंग व्यक्तीस शारीरीक व आर्थिकदृष्ट्या अतिशय गैरसोयीची ठरत आहे. त्यामुळे जिल्हा पातळीवर शल्य चिकित्सकांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या डॉक्टरांच्या वैद्यकीय मंडळांचे वैद्यकीय प्रमाणपत्र गृहित धरावे अशी विनंती अपंग व्यक्तीं/संस्थांकडून प्राप्त होत आहे.

२. रस्ते व वाहतुक महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या संदर्भ क्र.१ च्या अधिसूचनेतील परिच्छेद ६ नुसार अपंग व्यक्तीस वाहन चालविण्यासाठी अनुज्ञप्ती देताना त्यांना अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक जिल्हयात मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली अथवा वैद्यकीय महाविद्यालयात एक वैद्यकीय मंडळ स्थापन करण्याचे निर्देश प्राप्त आहेत. सदर वैद्यकीय मंडळात एक औषध शाखा तज्ञ (Medicine Specialist) आणि एक संबंधित विषयातील तज्ञ (PMR/Orthopedics Surgeon) हे सदस्य असतील असे नमूद करण्यात आले आहे.

३. केंद्र शासनाच्या सदर अधिसूचनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने, सर्व जिल्हा शासकीय रुग्णालयांमध्ये तसचे वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अशी वैद्यकीय महामंडळे स्थापन करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत त्वरीत कार्यवाही करण्याचे आदेश शासनस्तरावरुन निर्गमित करण्याबाबत या कार्यालयाच्या जा.क्र.८१०९ दिनांक २१.०६.२०१२ च्या संदर्भ क्र. २ द्वारे शासनास विनंती करण्यात आली होती.

४. त्या अनुषंगाने शासनाने दि.१३.०२.२०१३ रोजीच्या संदर्भीय पत्र क्र.३ व्दारे केंद्र शासनाच्या दिनांक २३.७.२००८ च्या अधिसूचनेनुसार अपंगाना वाहन चालविण्यासाठी अपंगत्वाचे प्रमाणपत्र/दाखला देण्याकरीता जिल्हा स्तरावर वैद्यकीय मंडळ स्थापन करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक ६.१०.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा, ग्रामीण सामान्य रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वैद्यकीय मंडळे स्थापन करण्यात आली असल्याचे कळविले आहे. (प्रत संलग्न)

५. सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यालयात वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती प्राप्त करण्यासाठी येणाऱ्या अपंग व्यक्तींनी सादर करावयाचे वैद्यकीय प्रमाणपत्र जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा, ग्रामीण सामान्य रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वैद्यकीय मंडळे यांचेकडून प्राप्त करण्यासंबंधी अपंग व्यक्तींना योग्य ते मार्गदर्शन करावे. रिहॅबीलीटेशन सेंटर, हाजी अली, मुंबई याच संस्थेकडून वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याचा आग्रह धरु नये.

तसेच सदर निर्णयाची प्रत जनतेच्या माहितीकरीता कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात यावी तसेच स्थानिक पातळीवर विविध प्रसिध्दी माध्यमाद्वारे यास प्रसिध्दी देण्यात यावी.

६. संदर्भ क्र.४ वर नमूद केलेला सार्वजनिक आरोग्य विभागाचा शासन निर्णय क्रं अप्रवि २०१२/प्रक्र २९७ आरोग्य ६ दिनांक ०६.१०.२०१२ हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

२३/०५/१३

**अपर परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**अपंग शासकीय कर्मचाऱ्यांची वाहने नोंद करण्याची कार्यपध्दती.**

**परिवहन आयुक्त कार्यालय**
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

**क्रमांक :** एमव्हीआर-०९१२/सीआर-४६ईबी/का.२(४)/जा.क्र. 1512 दिनांक- -6 FEB 2015

**संदर्भ -** मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र.३२९४/२०१० मधील दि.२५/०९/२०१४ रोजीचे आदेश.

**प रि प त्र क**

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.३२९४/२०१० मधील दि.२५/०९/२०१४ रोजीचे आदेशान्वये अपंग शासकीय कर्मचाऱ्यांची वाहने नोंद करण्याच्या कार्यपध्दतीबाबत निर्देश जारी केले आहेत. सदर आदेशाची प्रत दि.२२/१२/२०१४ रोजीच्या ई-मेलव्दारे यापूर्वीच आपणास पाठविण्यात आली आहे. (प्रत संलग्न)

अपंग शासकीय कर्मचारी प्रथम जिल्हा रुग्णालयातून त्याला कोणते वाहन कोणत्या फेरफारासह चालविता येईल याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र प्राप्त करेल. तद्नंतर सदर कर्मचारी त्याच्या प्रशासकीय विभागाकडे निधीसाठी अर्ज करेल. निधी प्राप्त झाल्यावर अधिकृत वाहन विक्रेत्याकडून वाहन खरेदी करुन त्यास मान्यताप्राप्त रेट्रोफिटरकडून किट बसविण्यात येईल. त्यानंतर सदर वाहन 'अपंगांचे वाहन' या संवर्गात नोंदणीसाठी परिवहन अधिकाऱ्यांसमक्ष सादर करेल. सदर वाहन संबंधित अपंग कर्मचाऱ्याने चालविण्यासाठी सुयोग्यरित्या अनुकूल असल्याची तपासणी करुन सदर वाहनाची नोंदणी करण्यात येईल. त्यानंतर कर्मचाऱ्यास त्या वाहनाचा नोंदणी क्रमांक नमूद करुन शिकाऊ अनुज्ञप्ती जारी करण्यात येईल. वाहन परिवहन कार्यालयात सादर केल्यापासून त्याची नोंदणी करुन शिकाऊ अनुज्ञप्ती जारी करण्याची प्रक्रिया लवकरात लवकर परंतु एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी. केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १५(१) प्रमाणे ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यावर विहित पध्दतीने चाचणी घेऊन गुणवत्तेवर पक्की अनुज्ञप्ती जारी करण्याची कार्यवाही करावी.

***(मा.परिवहन आयुक्त यांच्या मान्यतेने)***

05/02/15

**(सतिश बा. सहस्त्रबुध्दे)**
**अपर परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रति,**
**सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.**

**प्रत -**

१) अपर मुख्य सचिव, गृह (परिवहन) विभाग, जागतिक व्यापार केंद्र, कफपरेड, मुंबई ४०० ००५ यांना माहितीस्तव सादर.

२) परिवहन उप आयुक्त (संगणक), यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.